# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे -411001

web : www.dhepune.gov.in E-mail- schol.dhepune@gov.in

फोन नं -020/29707098/26126939 फॅक्स 020/26111153

क्र.उशिंस शिष्यवृत्ती/ व्या.अ.प्र.मु./2024 दिनांक-

**महत्वाचे परिपत्रक**

**विषय - श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा.मंत्री उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांचा विद्यार्थी पालक व संस्था प्रतिनिधी यांचेशी संवाद.**

संदर्भ - 1. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2017/प्र.क्र 332/तांशि-4,दि.7.10.2017
2. शासन निर्णय क्र. शिष्यवृ-2024/प्र.क्र105/तांशि-4,दि.8जुलै,2024

शासन निर्णय दि. 07.10.2017 नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/सार्वजनिक विद्यापीठे, शासकिय अभिमत विद्यापीठे(खाजगी अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु.8.00 लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुला-मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कात 100 टक्के लाभ देण्यात येतो.

आता शासन निर्णय क्र.2 नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने/सार्वजनिक विद्यापीठे,शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठ /स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे(Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील/संस्था स्तरावरील प्रवेश वगळून)प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.8.00 लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामायिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन ऐवजी 100 टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष 2024-25 पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच वरीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क यामध्ये 100 टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.8.00 लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पर्वीपासून प्रवेशि असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या),महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दि.06.04.2023 मध्ये नमुद केलेला"संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र शासन**
**विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**
राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४
E-mail: jtdirhekop@rediffmail.com
फोन क्र. : (०२३१) २५३५४००, २५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००

जा.क्र. : शिससं/उशि/कोवि/शिष्यवृत्ती/ २०२४/४२३७ दिनांक :- 23.07.2024

**प्रति,**
**अध्यक्ष/सेक्रेटरी/सचिव/कार्यवाह/प्राचार्य,**
**सर्व अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/**
**कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालये,**
**कोल्हापरू/सांगली/सातारा.**

**विषय :- श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांचा विद्यार्थी पालक व संस्था प्रतिनिधी यांचेशी संवाद.**

संदर्भ :- १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शा.नि.क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७.१०.२०१७
२. शासन निर्णय क्र. शिष्यवृ -२०२४/प्र.क्र. १०५/तांशि-४, दि. ०८ जुलै २०२४
३. संचालनालयाकडील पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/व्या.अ.प्र.मु./२०२४, दि.

उपरोक्त विषयांकीत बाबत कळविण्यात येते की, शासन निर्णय दि. ०७.१०.२०१७ नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विना अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतन/सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे ( खाजगी अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. ८.०० लक्ष किंवात्यापेक्षा कमी आहे. अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुला मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क त १०० टक्के लाभ देण्यात येतो.

आता शासन निर्णय क्र.२ नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विना अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतन/सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process- CAP) ( व्यवस्थापन कोटयातील/संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामायिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या ( अर्जाचे नुतनीकरण केलेल्या ) मुलींना, उच्च व तंत्रशिक्षण विभाग वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच वरीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नूतनीकरण केलेल्या ) महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय

दि. ०६.०४.२०२३ मध्ये नमुद केलेला संस्थात्मक व संस्थाबाहय या वर्गवारीमध्ये सामाविष्ठ होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे घेण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाद्वारे विद्यार्थी हिताच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांबाबतची माहिती देण्याकरीता राज्यातील सर्व विदयार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांचे सोबत **श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि. २५ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० दरम्यान Webinar च्या माध्यामातून संवाद साधणार आहे.**

तरी या कार्यक्रमाचे LIVE प्रक्षेपण आपापल्या संस्थांमध्ये मोठया पडद्यावर (screen वर) सर्व विदयार्थी व पालक यांना दिसेल व ऐकू येईल अशा पध्दतीची व्यवस्था करण्यात यावी व याकरीता आपापल्या संस्थेतील/ विद्यापीठ/ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व पालक यांना सदर कार्यक्रमास संस्थेत उपस्थित राहणेबाबत सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्या.

या कार्यक्रमासाठी Webinar ची लिंक खालीलप्रमाणे आहे.

**http://www/parthlive.com**

( डॉ. अशोक उबाळे )
विभागीय सहसंचालक (उ.शि.)
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

प्रत -

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितस्तव सविनय सादर.

२. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.